## प्रयास

त्या सरींचा अन लहरींचा, भाव अंतरी उरे..
चिंब तुझे अन धुंद माझे, वेगळेपण ही नुरे !

ठाव घेती या मनाचा, त्या क्षणांचा सोहळा,
मीच होते एक राधा, तूच माझा सावळा !

लोटली युगे परंतु, अजुनी साद ओली मनी,
आठवांची तोरणेही, झुलती आसमंतातुनी !

प्रेमगीत आपुले जे, गाती पाखरांचे थवे,
तेच वेडे क्षण फिरुनी, वाटती हवे - हवे !

दोन चक्रांचा आता हा, भिन्न-वेगळासा प्रवास,
क्षितिजापार भेटण्याचा, तरी करूया का प्रयास?

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**